RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक ८] मंगळवार, जानेवारी १७, २०२३/पौष २७, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ११**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ जानेवारी २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम.**

क्रमांक एमव्हीआर-०३२१/प्र.क्र.४१/परि-२.—ज्याअर्थी, केंद्र शासनाने अधिसूचना क्र. जीएसआर ६५३ (ई), दिनांक २३ सप्टेंबर २०२१ अन्वये कलम ५९ च्या उप-कलम (४) आणि मोटार वाहन कायदा, १९८८ (१९८८ चा ५९) च्या कलम ६४ च्या खंड (p) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून जारी केले. मोटार वाहन (वाहन स्क्रॅपींग सुविधेची नोंदणी आणि कार्य) नियमावली, २०२१ (यापुढे स्क्रॅपिंग नियम म्हणून संबोधण्यात येईल), अंतर्गत मोठ्या संख्येने आयुर्मान संपत आलेली जुनी वाहने रस्ता सुरक्षेच्या दृष्टीकोनातून निष्कासित करणे आवश्यक आहे व अशी वाहने निष्कासित केल्यामुळे रस्त्यावर पर्यावरणपूरक वाहने चालतील ;

आणि, जी वाहने मोटार वाहन (वाहन स्क्रॅपींग सुविधेची नोंदणी आणि कार्य) नियमावली, २०२१ अंतर्गत विहित केलेल्या नियम ६ अन्वये नोंदणीकृत वाहन स्क्रॅपिंग सुविधेमार्फत वाहन स्क्रॅप करण्यासाठी अर्ज करतील अशा वाहनांच्या बाबतीत महाराष्ट्र मोटार वाहन कायदा (LXV of १९५८) च्या कलम ८(अ) अंतर्गत कलम ३ अन्वये देय असणाऱ्या करावरील व्याज व कलम ३(अ) अन्वये देय असणाऱ्या पर्यावरण कर व त्यावरील व्याज माफ करणे आवश्यक असल्याचे राज्य शासनाचे मत झाले आहे.

आता त्याअर्थी, जी वाहने नियम ६ अन्वये नोंदणीकृत असणाऱ्या वाहन स्क्रॅपिंग सुविधेमार्फत वाहन स्क्रॅप करण्यासाठी अर्ज करतील अशा वाहनांच्या बाबतीत, महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमाच्या (१९५८ चा ६५) कलम १३ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन महाराष्ट्र मोटार वाहन कायदा (LXV of १९५८) च्या कलम ८(अ) अंतर्गत कलम ३ अन्वये देय असणाऱ्या करावरील व्याज व कलम ३(अ) अन्वये देय असणाऱ्या पर्यावरण कर व त्यावरील व्याज माफ करीत आहे. ही अधिसूचना जारी केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या आत अर्ज करणाऱ्या व्यक्तीस सदर व्याज माफी लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र होळकर,**
शासनाचे सहसचिव.

**HOME DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 17th January 2023.

*NOTIFICATION*

Maharashtra Motor Vehicle Tax Act.

No. MVR-0321/C.R.41/ TRA-2.—Whereas, the Government of India has, *vide* Notification, Ministry of Road Transport and Highways, No. G.S.R. 653(E), dated the 23rd September 2021, issued in exercise of the powers conferred by sub-section (*4*) of section 59 and clause (*p*) of section 64 of the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), framed the Motor Vehicles (Registration and Functions of Vehicle Scrapping Facility) Rules, 2021 (hereinafter referred to as “the Scrapping Rules"), to phase out the large number of old vehicles which are attaining end of life to ensure road safety and to ensure that the environment-friendly vehicles *shall be ply* on the road;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to remit the interest payable under section 8A of the Maharashtra Motor Vehicles Tax Act (LXV of 1958) on the outstanding amount of tax levied under section 3 of the said Act and to exempt the environment tax and interest thereon levied under section 3A of the said Act, on the motor vehicles in respect of which an application for scrapping has been made to a Registered Vehicle Scrapping Facility (RVSF) registered under rule 6 of the Motor Vehicles (Registration and Functions of Vehicle Scrapping Facility) Rules, 2021;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*2*) of section 13 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act (LXV of 1958), the Government of Maharashtra hereby remits the whole of the outstanding interest payable under section 8A of the said Act on the outstanding amount of tax levied under section 3 of the said Act and exempts outstanding environment tax and interest thereon levied under section 3A of the said Act, subject to condition that such remission or exemption shall be applicable to the motor vehicles in respect of which an application for scrapping has been made to a Registered Vehicle Scrapping Facility (RVSF) registered under rule 6 of the said rules within three years from the date of issue of this notification.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. M. HOLKAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.